संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)
जनसंपर्क विभाग

## 'रिसेंट ट्रेन्ड्स इन लाईफ सायन्सेस फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेन्ट' विषयावर राष्ट्रीय परिषदेचे विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने आयोजन
## २२ व २३ जानेवारीला होणार परिषद

अमरावती.

यु.जी.सी. व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभाग यांचे संयुक्त विद्यमाने 'रिसेंट ट्रेन्ड्स इन लाईफ सायन्सेस फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेन्ट' विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि. २२ व २३ जानेवारी, २०१९ रोजी विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात करण्यात आले आहे.

राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर भूषवतील. प्रमुख अतिथी म्हणून इ.बी.जी.डी., निरी, नागपूरचे प्रमुख डॉ.एच.जे. पुरोहित उपस्थित राहणार असून उच्च शिक्षण विभाग, पुणेचे माजी संचालक डॉ.के.एम. कुलकर्णी यांची प्रामुख्याने उपस्थित लाभणार आहे. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून माजी प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ.आर.आर. धांडे उपस्थित राहतील.

परिषदेसाठी 'रिसेंट ट्रेन्ड्स इन लाईफ सायन्सेस फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेन्ट' ही मुख्य थीम ठेवण्यात आली असून ॲनिमल फिजीऑलॉजी, ॲनिमल सायन्स, अप्लाईड झूलॉजी, ॲक्वाकल्चर, बायोकेमिस्ट्री, बायोडायव्हर्सिटी, बायोइन्फॉरमॅटिक्स, बायोटेक्नॉलॉजी, इकॉलॉजी, इन्टोमोलॉजी, जेनेटिक्स, इम्युनोलॉजी, मायक्रोबॉयलॉजी, मोलेक्युलर बॉयलॉजी, नॅनोटेक्नॉलॉजी, पॅरासिटोलॉजी, टॉक्सिकोलॉजी, वाईल्ड लाईफ आदी सब थीम्स ठेवण्यात आल्या आहेत.

तरी परिषदेला जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. अजय देशमुख व संयोजक तथा प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ.एच.पी. नांदुरकर यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १५/०१/२०१९.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,
आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी